**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २९/२०१६-१७/१९४ दिनांक: १७-११-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. २९/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | सौ.सुनिता अरुणकुमार गोयंका<br>११/४४५ कापड मार्केटच्या मागे इचलकरंजी<br>ता. हातकणंगले, जिल्हा. कोल्हापूर : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इचलकरंजी | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग इचलकरंजी ब | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) तक्रारदार सौ. सुनिता अरुणकुमार गोयंका रा. इचलकरंजी जि. कोल्हापूर यांनी वॉर्ड क्र.११ मधील घर क्र.४४५ येथे सिंगल फेज व्यापारी वीज जोडणी जून २००१ मध्ये घेतली होती. त्यावेळी सर्व कागदपत्रांची पूर्तताही त्यांनी केली होती. तक्रारदार यांनी त्यांना मिळालेली वीज देयके वेळोवेळी वक्तशीर भरलेली आहेत. तथापि दि. १४-०६-२०१६ रोजी वि.प. यांनी तक्रारदार यांना नोटीस पाठवून कळविले की, तक्रारदार यांच्या सदर जागेतील पूर्वीचे वीज ग्राहक राजाराम दत्तात्रय बडवे (ग्राहक क्र. २५०३८००१७३०६) यांची वीज जोडणी कायम स्वरुपी खंडीत केली असून श्री बडवे यांचेकडून येणे असलेली संपूर्ण थकबाकी तक्रारदार यांनी भरावी. तक्रारदार यांच्या कथनाप्रमाणे त्यांचा व सदर राजाराम बडवे यांचा काहीही संबंध नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे गा-हाणे दिनांक ११-०७-२०१६ रोजी दाखल केले. सदर कक्षाने दिनांक ०५-१०-२०१६ च्या आदेशाने, काल्पनिक थकबाकी कमी करुन आणि सुरक्षा ठेव जमा करुन घेऊन उर्वरीत रक्कम तक्रारदारकडून वसूल करण्याचा निर्णय दिला. त्या निर्णयावर नाराज होऊन प्रस्तुत अपिल या मंचासमोर दाखल केले आहे.

२) वि.प. वितरण कंपनी यांनी त्यांच्या लेखी निवेदनात असे कथन केले आहे की, उपरोक्त राजाराम दत्तात्रय बडवे यांना दि. १२-११-१९७१ रोजी वरील ग्राहक क्रमांकाची वीज जोडणी थ्री फेज ५ अश्वशक्ती यंत्रमाग वापरासाठी दिलेली होती. जून २००० नंतर राजाराम बडवे यांनी वीज देयके भरली नसल्याने त्यांचा वीज पुरवठा रु. १,२३,४९६/- इतक्या थकबाकीसाठी दि. ३१-०८-२००५ रोजी कायम स्वरुपी खंडीत करणेत आला होत. दि. ०१-११-२०१६ रोजी वितरण कंपनीने अशा ग्राहकांसाठी पी.डी. अॅम्नेस्टी स्कीम सुरु केली आहे. वि.प. यांनी शेवटी ग्राहकास वीज देयक भरणेचा आदेश करावा असे मंचास कळविले आहे.

३) सदर प्रकरणाची सुनावणी दि. १६-११-२०१६ रोजी या मंचासमोर घेणेत आली. तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री विनोद कांबळे आणि वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री सागर मारुळकर कोल्हापूर मंडल कार्यालय,आणि श्री नंदकुमार काळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता इचलकरंजी विभाग यांचा तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला. सर्व उपलब्ध कागदपत्रांचे वाचन करणेत आले आहे.

४) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

(१) विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६ प्रमाणे पूर्वीचे ग्राहक श्री राजाराम दत्तात्रय बडवे यांची थकबाकी प्रस्तुत तक्रारदार यांचेकडून वसूल करता येईल काय?
उत्तरः- नाही.

(२) कोणता अंतिम आदेश?
उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

**कारणमिमांसा**

५) इचलकरंजी येथील वॅार्ड क्र.११ मधील घर क्र. ४४५ या ठिकाणी तक्रारदार यांचे व्यापारी वीज कनेक्शन जून २००१ पासून सुरु आहे. त्यांचा ग्राहक क्र. २५०६४४०२५१२४ असा आहे. असे दिसून येते आहे की, वरील जागेतच कोणी राजाराम दत्तात्रय बडवे या गृहस्थांचे थ्री फेज ५ अश्वशक्ती औद्योगिक यंत्रमागासाठी वीज जोडणी नोव्हेंबर १९७१ मध्ये तत्कालीन म.रा.वि.मंडळ यांनी दिलेली होती. राजाराम बडवे यांचा वीज पुरवठा रु. १,२३,४९६/- इतक्या मोठया थकबाकीसाठी दि. ३१-०८-२००५ रोजी कायम स्वरुपी बंद करणेत आला होता. तथापि, त्यापूर्वीच सन २००१ मध्ये तक्रारदार यांना व्यापारी कारणासाठी वीज जोडणी देणेत आली होती.

६) तक्रारदार सौ. सुनिता अरुणकुमार गोयंका आणि उपरोक्त श्री राजाराम दत्तात्रय बडवे यांचा पूर्वीचे आणि सध्याचे वीज ग्राहक या खेरिज अन्य कोणताही संबंध असल्याचे दिसून येत नाही. त्या उभयतामध्ये कोणताही नातेसंबंध नाही, असेही तक्रारदार यांचे स्पष्ट कथन आहे.

७) एखाद्या पूर्वीच्या ग्राहकाची वीज थकबाकी, वितरण कंपनीच्या परिपत्रक क्र. ६०७ दि.१९-१२-१९९८ प्रमाणे नंतरच्या वीज ग्राहकाकडून वसूल करता येईल असे जरी मानले तरी विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६ (२) प्रमाणे काही नियमाची पूर्तता झाली असणे गरजेचे आहे. पूर्वीच्या वीज ग्राहकाकडून येणे असणारी थकबाकी मुदतीमध्ये असणे जरुरीचे आहे. ती थकबाकी अव्याहतपणे (Continuously ) वसूलीस पात्र असल्याचे दर्शविण्यात आले असले पाहिजे. कलम ५६(२) प्रमाणे मागिल दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीची अशी थकबाकी मुदतबाहय ठरते. कलम ५६(१) नुसार वितरण कंपनीस अशा थकबाकीदार ग्राहकास पंधरा दिवसांची रितसर नोटीस देऊन सक्षम न्यायालयात दावा दाखल करता येतोच, शिवाय वीज पुरवठा खंडीत सुध्दा करणेचा अधिकार आहे.

वरील परिपत्रका संदर्भात सांगायचे झाले तर हे नमूद करावे लागेल की, मा. नामदार मुंबई उच्च न्यायालयाने ते परिपत्रक रद्दबातल ठरविल्यानंतर त्याच्या वैधतेचा प्रश्न मा. नामदार सर्वोच्च न्यायालयात अद्यापही प्रलंबित आहे.

८) प्रस्तुत प्रकरणांत, वितरण कंपनीने उपरोक्त श्री राजाराम बडवे यांचे विरुध्द , वीज जोडणी कायम स्वरुपी बंद करण्या व्यतिरिक्त , कलम ५६ प्रमाणे अन्य काही कारवाई केली असल्याचे आढळून येत नाही.

९) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत वितरण संहिता आणि पुरवठयाच्या इतर शर्ती ) विनियम २००५ मधील परिच्छेद १०.५ चा आधार वि.प. तर्फे घेणेत आला आहे. तथापि त्यातील परंतुका प्रमाणे, पुढील ग्राहकाकडे वर्ग होणारी अशी जबाबदारी जास्तीत जास्त सह महिन्या अगोदर पर्यन्तच्या कालावधीत पुरविलेल्या वीजेच्या आकारणी पुरताच मर्यादित रहाते.

१०) दिनांक ०१-११-२०१६ पासून वितरण कंपनीने P.D.Amnesty Scheme सुरु केली आहे असे दिसते. त्याबाबतीतला काही पत्रव्यवहार आणि परिपत्रके क्र. ७ व २३ च्या प्रती वि.प. यांनी दाखल केला आहे. तथापि विद्युत कायदा २००३ या कायद्यातील तरतूदी, तसेच कलम ५६ मधील तरतूद दुर्लक्षित करता येणार नाही.

११) वर नमूद केलेले श्री राजाराम दत्तात्रय बडवे यांनी जून २००० पासून विद्युत बिले वि.प. कडे भरली नाहीत व त्यामुळे त्यांची वीज जोडणी अखेर दि. ३१-०८-२००५ रोजी कायमपणे बंद करणेत आली. सन-२००१ पासून तक्रारदार त्याच जागेमध्ये व्यवसाय करीत आहेत. त्यांचा एकमेकांशी कसलाही हक्कसंबंध/नातेसंबंध नाही. वितरण कंपनीला राजाराम बडवे यांचेकडून येणे असलेली तथाकथित थकबाकी वसूलीसाठी योग्य त्या कायदेशीर मार्गाचा अवलंब करता येईल. प्रस्तुत तक्रारदार विरुध्द वि.प. यांनी थकबाकी वसूलीची सुरु केलेली कारवाई रद्द केली जाण्यास पात्र आहे.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांचा गा-हाणे अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२) विरुध्द पक्षकार -वितरण कंपनी यांनी तक्रारदार सौ. सुनिता अरुणकुमार गोयंका रा. इचलकरंजी जि. कोल्हापूर यांचे विरुध्द श्री राजाराम दत्तात्रय बडवे यांची कथित थकबाकी वसूल करणेसाठी सुरु केलेली कारवाई रद्द करण्यात येत आहे. या कारणा वरुन तक्रारदार यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येऊ नये असे वि.प. यांना सुचित करण्यात येत आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |